International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील मानवता व वारकरी चळवळ

**प्रा. भोसले प्रवीण लालासो**
*दहिवडी कॉलेज, दहिवडी*
*Corresponding Author – प्रा. भोसले प्रवीण लालासो*

DOI - 10.5281/zenodo.18654397

**प्रस्तावना:**

२१ वे शतक हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. विज्ञानाच्या जोरावर अनेक चमत्कारिक बदल झालेले दिसतात. पण आजच्या काळात ही लाखो लोक पंढरीची वारी नित्य नियमाने करताना दिसतात. तेराव्या शतकापासून वारकरी चळवळ अर्थात भक्ती चळवळ महाराष्ट्रात उभी राहिलेली दिसते.याचे कारण म्हणजे संतानी दिलेले मानवतावादी विचार हे होय. समाजातील जातीभेद, धर्मभेद, वर्णभेद याला बाजूला सारून समतेचे नाते निर्माण करणारी ही चळवळ आहे. वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला तर त्याचा कळस होण्याचा मान संत तुकोबारायांना मिळाला. म्हणून आज सुद्धा हे समतेचे विचार आपल्याला वारकरी संप्रदायात दिसून येतात. वारकरी संप्रदायात कोणतेच भेद पाळले जात नाहीत.मानवता हीच जात, धर्म व पंथ आज सुद्धा सुरू आहे. याचे कारण महाराष्ट्रातील सर्व संतांचे समतावादी विचार हेच सांगता येतील.माणसाच्या षडरिपूवर म्हणजेच काम, क्रोध,मोह, माया,मत्सर,मद यांच्या अधीन झालेल्या समाजाला, दिशा देण्याचे काम वारकरी चळवळीने केलेलं दिसतं. भोळ्या, भाबड्या लोकांना सत्य, शांती, विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान देण्याचे कार्य वारकरी संप्रदाय करतो. वारकरी संप्रदायात जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत हा भेद दिसत नाही .सामाजिक समतेचे विचारधन जोपासलेले दिसते. याचे कारण म्हणजे संतांचे मानवतावादी विचार हेच होय. याच संत परंपरेतील संत तुकोबाराया यांच्या अभंगातील मानवतावादी विचार व व त्यांचा दृष्टिकोन प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्यात येईल. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून फक्त अध्यात्मिक विचार न देता लोकांना सामाजिक समतेचे विचार व अन्यायविरुद्ध संघर्षाचे विचार दिलेले दिसतात. 'बुडती हे जन, न देखवे डोळा' या अभंग ओळीप्रमाणे समाजातील गोरगरीब, भोळ्या, भाबड्या, अज्ञानी जनतेला वेदाचा अर्थ सोप्या साध्या भाषेत सांगितलेला दिसतो. संत तुकाराम महाराजांना जगद्गुरु म्हटलं जातं, याचं कारण त्यांच्या अभंगातून फक्त होणारे आध्यात्मिक विचार व सामाजिक समतेचा दृष्टीकोन. संत तुकाराम महाराज हे विवेक वादी व समाज सुधारक होते. ते आपल्या आयुष्यात देव मानत होते का नाही हा संशोधनाचा विषय राहील. पण देव कुणाला म्हणावं याविषयी आपल्या अभंगातून सांगतात की,

'जे का रंजले गांजले|
त्यासी म्हणे जो आपले||
तोच साधू ओळखावा|
देवतेची जाणवा ||

संत तुकाराम महाराज यांचे जीवन अनुभव व त्यांचे अभंग हे एकरूप वाटतात. त्यामुळेच त्यांचे अभंगवाणी अनुभवातून प्रकट होताना दिसते. संसारातील सुख, दुःख, व्यथा वेदना तुकोबारायांनी आपल्या अभंगातून मांडलेल्या दिसतात. संत तुकाराम महाराजांनी संत नामदेवांची कीर्तन

परंपरा अबाधित ठेवलेली दिसते. आपल्या अभंगवाणीतून लोकांना शहाणे करून सोडावे हा विचार त्यांच्या मुळाशी होता. समाजातील अज्ञानी लोकांना जागृत करण्याचे काम तुकोबारायांनी आपल्या अभंगवाणीतून केलेली दिसते. समाजातील लोकांना मानवतावादी विचार द्यावा, अंधश्रद्धेपासून लोकांना बाजूला ठेवावे, हीच भूमिका त्यांच्या अभंगाची होती. एकूणच संत तुकारामांचे अभंग हे स्व- अनुभवातून लिहिलेले होते. नुसत्या कवी कल्पना त्यांच्या अभंगातून व्यक्त झालेल्या दिसत नाहीत. ते जे जगत होते तेच अभंगातून व्यक्त करत होते. म्हणूनच त्यांच्या अभंगावरती त्यांच्या आयुष्याचा जीवन प्रवासाचा ठसा उमटवलेला होता. म्हणूनच संत तुकोबाराय यांचे अभंग व व्यक्तिमत्व येथे लक्षात घेऊया.

**१) संत तुकारामांचा जीवन प्रवास व व्यक्तिमत्व:**

संत तुकाराम यांचा जन्म देहू येथे इसवी सन १५९८( शक -१५२०) साली झाला. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले. (मोरे) त्यांचे कुटुंब सदन होते. त्यांच्या घरी परंपरेने पंढरपूरची वारी होती त्यांचा सावकारीचा व्यवसाय होता. संत तुकारामाचे आयुष्य फक्त ४२ वर्ष होते. या छोट्याशा आयुष्यात त्यांनी जीवनाचे विविध अनुभव घेतलेले होते. सुरुवातीला ते आपल्या संसारात 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारे' या विचारा प्रमाणे पारंपारिक व्यवसाय करत होते. वयाच्या १७ व्या वर्षानंतर त्यांच्या जवळच्या नात्यातील अनेक व्यक्तींचा मृत्यू होतो व त्यात आई-वडील थोरला भाऊ, भावजय यांच्या दुःखात ते बुडाले. धाकटा भाऊ सावजी वेगळा राहिला आणि अशाच परिस्थितीत महाराष्ट्रात खूप मोठा दुष्काळ पडला दुष्काळाने लोकांना अन्न मिळत नव्हते, गोरगरीब लोकांची दयनीय अवस्था त्यांनी स्वतःच्या डोळयांनी पाहिली आणि म्हणूनच आपल्या सावकारकीच्या वह्या त्यांनी इंद्रायणीत बुडवून टाकल्या व आपली धान्याची कोठारे गोरगरीब जनतेसाठी खुली केली. दुष्काळामुळे दुकानाचे दिवाळी निघाले होते. दुष्काळ एवढा तीव्र होता की त्यांची पहिली बायको व मुलगा त्यांच्या डोळयादेखत अन्न-अन्न करून मरण पावले, तुकोबारायांच्या वरती अनेक आघात होत होते. या सर्व अनुभवातून विरक्त व्हावे वैराग्य प्राप्त करावे असे त्यांच्या मनाने घेतले व 'लोकांत सोडून त्यांनी एकांत धरला' देहू गावाजवळच 'भंडारा' डोंगरावरती ते आध्यात्मिक चिंतन करू लागले. जीवन संसारातील दुःख, दैन्य, चिंता, अपमान हे सर्व त्यांनी अनुभवले होते आणि यातच त्यांची अभंगवाणी फुलत होती. त्यांचा धाकटा भाऊ सावजी त्यांना सोडून जात होता. याच अवस्थेमध्ये त्यांच्या अभंगातून नात्यातील लोकांपेक्षा वृक्षवल्लींना त्यांना संगे सोयरी वाटतं होतो.तुकोबारायांना आपल्या आयुष्यात खूप संघर्ष करावा लागला होता.त्यांचे परखड विचार सर्व सामान्य लोकांना प्रेरणादायी होते, समाजातील दांभिकतेवर त्यांनी टीका केली. त्यामुळे धर्मपीठा कडून त्यांना विरोध झाला होता. आपल्या आयुष्यातील सर्व संपत्ती धर्मपीठाने घेतली व अभंग इंद्रायणी नदीत टाकावे लागले.म्हणूनच संत तुकोबारायां विषयी किरण माने लिहतात की, 'संत तुकाराम महाराज' हे आपल्या संतपरंपरेतले असे एकमेव संत आहेत, ज्यांना धर्मपीठापुढे खेचून त्यांच्यावर खटला चालवण्यात आला! 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' म्हणणाऱ्या किंवा विठ्ठलासाठी 'भेटीलागी जीवा लागलीसे आस' अशी आळवणी करणाऱ्या या साध्यासरळ संतानं असा काय मोठ्ठा गुन्हा केला असेल? धर्मपीठाने त्याच्यावर नेमके कुठले आरोप लावले? शिक्षाही ठोठावली. घरदार-जमीनजुमला हडप केला. सगळयात वाईट म्हणजे तुकोबारायानं लिहिलेल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीच्या पाण्यात बुडवायला लावल्या. जवळजवळ चाळीस हजार अनमोल अभंग नदीत बुडवले. असं काय मोठं गौडबंगाल असेल त्या

अभंगात ? काय विचार असतील त्या अभंगांमध्ये जे त्या वैदिक धर्ममार्तंडांना धर्मद्रोही वाटत होते? काय होते त्यात, जे सर्वसामान्य गोरगरीब बहुजनांना आपलं वाटत होतं आणि त्याच गोष्टीची धर्मसत्तेला दहशत वाटत होती? (माने किरण, *शुद्ध बुद्ध काया!! तुकोबाराया' !!,* मधुश्री पब्लिकेशन,पुणे,प्रथम आवृत्ती,२०२५ ,पृष्ठ क्र.९) अर्थात तुकोबारायांचे अभंग हे समाजाला प्रबोधन करत होते.त्यामुळे त्यांना खूप संघर्ष करावा लागला होता.

**२) संत तुकारामांचे आत्मपर अभंग:**

'नामदेवें केले स्वप्नामाजी जागे| सवे पांडुरंगें येवोनिया| सांगितले काम करावे कवित्व |वाउगे निमित्य बोलो नये||या अभंगातून आपल्याला कविता करण्याची प्रेरणा संत नामदेवांनी दिली असे ते सांगतात, संत तुकोबारायांनी अंदाजे ५००० च्या दरम्यान अभंग लिहिलेले आहेत. संत तुकोबारायांचे अभंग जीवन अनुभवातून व्यक्त झालेले असल्यामुळे ते श्रोत्याच्या हृदयाची ठाव घेतात. माझे हे काव्य स्वतःचे नसून ते विठ्ठलाचे बोल आहेत हे सांगताना एका अभंगात म्हणतात काय म्यां पामरे |बोलावी उत्तरे |बोलविता धनी वेगळाचि||आपल्या अभंगाचे कर्तुत्व ते स्वतः घेत नाहीत तर जीवनातील सुखदुःख सांगताना ते रात्रंदिना युद्धाचा प्रसंग अभंगातून व्यक्त करतात. त्यांच्या आत्मपर अपंगातून ते हळवे झालेले वाटतात विठ्ठलाची भेट व्हावी परमेश्वर दिसावा परमेश्वराचा अनुभव यावा यासाठी त्यांचे मन व्याकूळ होते,

कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे ॥
तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा ॥
चुकलिया माये ।बाळ वेळोवेळा पाहे ॥
तुका तैसा तळमळी । जळावेगळी मासोळी ॥

यासारख्या अभंगातून परमेश्वराविषयी वाटणारी अर्तता व्यक्त होते. तुकोबारायांचे अंतर्मन व बाह्य जगातील अनुभव तुकोबारायांनी आपल्या अभंगवाणीतून व्यक्त केले आहेत. संत तुकारामांच्या अनुभव विश्वाविषयी हे.वि. इनामदार लिहितात की,"स्वतः तुकोबांचे अनुभवविश्व त्यांच्या काव्यातून प्रकट होते. आपला प्रापंचिक अनुभव आणि मुख्यतः आपली पारमार्थिक अनुभूती तुकोबांनी अभंगातून शब्दांकित केली आहे.(इनामदार हे. वि. *अनुभव तुकोबांचा,* स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९४, पृष्ठ क्रमांक ६.) संत तुकारामांचे अनुभवविश्व अभांगातून व्यक्त झालेले दिसते.

**३) संत तुकोबारायांची स्वत्वाची भावना:**

संत तुकोबारायाच्या आयुष्यातील त्यांचे सुरुवातीचे काव्य स्वतःतील षडरिपू वरती विजय मिळवण्यासाठी लिहिलेले दिसतात. स्वतःतील गुणदोष दूर जावेत तरच आपल्याला परमेश्वर भेटेल, आणि तरच आपण आध्यात्मिक उंची गाठू शकू हा त्यांचा अनुभव काही अभंगातून व्यक्त होताना दिसतो.

'माझिया मीपणावर पडो हे पाषाण|
जळो हे भूषण नाम माझे||

स्वतःतील काम, क्रोध, मोह,माया यावरती विजय मिळवल्याशिवाय स्वतःतील मीपणा घालवल्याशिवाय आपल्याला अध्यात्मिक उंची गाठता येणार नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता त्यामुळेच संसारिक जीवन त्यांनी टाळलेले दिसते व अध्यात्मिक उंची मिळावी यासाठी स्व-जाणीव व्हावी यासाठी ते चिंतन करू लागले. संत तुकारामांनी परमेश्वराला भेटण्याची तळमळ त्यांच्या अनेक अभंगातून व्यक्त केली आहे. विठ्ठलाला भेटण्याची तळमळ त्यांच्या अनेक अभंगातून व्यक्त होते आणि एवढे सर्व करून सुद्धा विठ्ठल भेटत नाही तो अनुभव कसा होता. या निराशेच्या अवस्थेत त्यांची नेमकी मनस्थिती काय होती आणि पुन्हा तुकोबारायांना आलेला अलौकिक अनुभव कसा होता. याविषयी. ल .रा . नशिराबादकर लिहितात की,"आणि एक दिवस 'अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ति'

असा दिव्य अनुभव येतो. आता अंधःकार निरसला. जगदाकार ढवळून निघाले. पांडुरंगाचे गीत गाता गाता भोग त्यागरूप बनला, तहानभूक हरपली, आणि मन विठ्ठलचरणी स्थिरावले. रक्त, श्वेत,कृष्ण, पीत अशी चिन्मय प्रभा दिसू लागली. नेत्र अर्धोन्मीलित होऊन अंगी रोमांच आले. कंठ सदगदित झाला. देशकाल वस्तुभेद मावळला आणि आपला आत्मा विश्वाकार झाल्याचा अलौकिक अनुभव तुकोबांना आला. 'अणूरणीया थोकडा' असणारा तुका आता आकाशाएवढा झाला. बोलणे-अबोलणे, असणे-नसणे यांच्या पलीकडे तुकोबा गेले. 'आपुले मरण पाहिले म्यां डोळां' असा दिव्य, अनुपम सोहळा त्यांनी अनुभवला, न देखोनीही सकळ पाहिल्याची जाणीव होऊ लागली. (नशिराबादकर ल .रा., प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आठवी आवृत्ती २००५, पृष्ठ क्रमांक १५३-५४) संत तुकाराम यांना आलेला अलौकिक अनुभव आपल्या अभंगातून व्यक्त करतात 'आनंदाचेडोही आनंद तरंग| आनंदाचे अंग आनंदाचे'||'ही अनुभूती त्यांच्या काव्यातून व्यक्त होते.

**४) सामाजिक उपदेशपर अभंग:**

संत तुकारामांचे सर्वात मोठे योगदान त्यांनी केलेलं संसारिक लोकांना उद्देश संसार आणि अध्यात्म याविषयी अनेक अभंग त्यांनी सांगितलेले आहेत. संसार करत असताना संसारातील चक्रातून माणूस सुटू शकत नाही, हा अनुभव त्यांच्या अभंगातून येतो. क्षणिक, सुख शोधत माणूस आयुष्य जगत असतो. पण संसारात सुखापेक्षा दुःखच जास्त असतं. बहिणाबाई चौधरी 'अरे संसार संसार' या कवितेत म्हणतात, 'ऐका संसार संसार, दोन्ही जीवाचा विचार, देतो दुःखाले होकार आणि सुखाले नकार.'संसारात सुख ही खूप कमी आहे ,अल्प आहे. पण दुःख खूप आहेत हाच विचार संत तुकोबाराय यांनी सुद्धा आपल्या अभंगातून मांडला आहे.

"सुख पाहता जवापाडे |दुःख पर्वताएवढे ||
तुका म्हणे त्याचे डोळे |भरूनिया पाहिजे ||"

या अभंगातून तुकोबारायांनी संसारातील क्षणभंगुरता पटवून दिलेले आहे. त्यांचे स्वः अनुभव संसारातील व्यक्त करतात, लोकांना स्वतःवरती, देहावरती, तारुण्यावरती खूप गर्व असतो हे तारुण्य क्षणभंगुर आहे या तारुण्यात आपण नम्रतेने वागलं पाहिजे यासाठी ते सांगतात की, 'देह हे देवाचे धन कुबेराचे, तेथे मनुष्याचे काय आहे' त्यांचेही विचार हे वैश्विक वाटतात जगातील सर्व मनुष्यासाठी हा उपदेश असावा असं वाटतं. तसेच जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे, लोकांना हा उद्देश खूप रोकडया शब्दात कवीने सांगितलेला आहे. हा अनुभव तुकोबारायांनी अभंगातून व्यक्त केलेला दिसतो.

"धन मिळवून कोटीसवे न ये रे लंगोटी |
जळो ते धन धन कोटी ||
असावे तसे असणे |
जे जे होईल ते ते मनास आवडे ||
तुका म्हणे माझे |मज तुका देई पांडुरंगे ||

तुकोबारायाच्या अभंगातून जगातील सर्व मानवांसाठी हा उपदेश महत्त्वाचा वाटतो. सत्ता, संपत्ती, पैसा कितीही असला तरी कोणताही माणूस अंतकाळी आपल्या बरोबर काहीच घेऊन जात नाही, हा वैश्विक असा संदेश कवीने दिलेला आहे. संसारातील लोकांना तुकोबारायांनी अनेक अभंगातून उपदेश रोकडया शब्दात संदेश सांगितलेला आहे. पुढील एका अभंगात समाजातील लोक कशी टीका करताना, दोन्ही तोंडाने बोलतात हे सांगितले आहे.

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावन देवराया ॥
संसार करिता म्हणती हा दोषी। टाकिता आळसी पोटपोसा ॥
आचार करिता म्हणती हा पसारा । न करीं त्या नरा निंदिताती ॥

संतसंग करितां म्हणति हा उपदेशी। येरां अभाग्यासि ज्ञान नाही ॥
धन नाही त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ॥
बहु बोलों जातां म्हणतीहा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥
भेटीसि न वजातां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविले ॥
लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ॥
निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचे मूळ पोरवडा ॥
लोक जैसा ओक धरिता धरवे ना। अभक्ता जिरे ना संतसंग ॥
तुका म्हणे आतां ऐकावे वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ॥

लोकांच्या टीकाटिप्पणीला खऱ्या अर्थाने आपण किती महत्व द्यावे व आपण आपल्या मार्गाने अध्यात्म व संसार याची सांगड कशी घालावी याचा संदेश संत तुकोबारायांनी वरील अभंगातून दिलेला आहे.

**५) संत तुकारामांचे विद्रोही अभंग:**

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून, अंधश्रद्धेत बुडालेल्या समाजाला डोळस करण्याचं काम केलेलं आहे. यासाठी त्यांची लेखणी परखड व रोकडे शब्दात समाजातील ढोंगी साधू संतांना त्यांची जागा दाखवते. तुकाराम महाराजांचा हा प्रसिद्ध अभंग आहे!

"दावूनी वैराग्याच्या कळा |भोगी विषयाचा सोहळा ||
आम्ही न धरावे कवणासी भाव |जे जे होईल ते ते ठाव ||
तुका म्हणे त्याचे पाय |तेणे करावे समाधान ||

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून ढोंगी साधू संतांना वैराग्याचे नाटक करू नये, या विषयी परखड शब्दात टीका केली आहे. तसेच जे ढोंगी संत दुसऱ्या संतांचे अभंग आपल्या नावावरती सांगत असतील अशाही लोकांवरती तुकोबारायणी रोकडया शब्दात त्यांची हजरी घेतली आहे".

उष्ट्या पत्रावळी करूनिया गोळा |दाविलीसे कळा विद्वत्त्वाची ||
अन्न ते जे अन्नदाता |तेथे का करावे आतिथ्य ||
तुका म्हणे माझी नाही कथा |मज तुझी गरिबीची चिंता ||"

तुकोबारायांच्या काळात सालोमालोसारखे भुरटे कवी होते. त्यांच्या वरती परखड शब्दात त्यांनी टीका केलेली दिसते.तसेच जशास तसे वागावे हेही सांगताना तुकोबाराय उपदेश करतात की,

पाया झाला नारू । तेथे न बांधा कापुरु ॥ तेथे बिबव्याचे काम । अधमासि तो अधम ॥
देवावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ॥ तेथे पैजारेचे काम । अधमासि तो अधम ॥

तुकोबारायांनी समाजातील अनिष्ट चाली रीती विषयी परखड व निर्भीड शब्दात टीका केली आहे. तुकोबारायांनी आपल्या जीवनप्रवासात खूप संघर्ष केलेला होता, त्यामुळे त्यांचा या संघर्षा विषयी बा. रं. सुंठणकर लिहितात की,

"तुकाराम अंतःकरणात येणारे कढ बोलून दाखवीत असत म्हणूनच त्यांचे अभंग रसाळ आणि जिव्हाळयाचे वाटतात. केवळ भोळसट विरक्त देवभक्त अशा दृष्टीने तुकारामांकडे पाहून त्यांच्या जीविताचे रहस्य समजणार नाही, त्यांच्या चरित्राकडे निराळया दृष्टीने पाहिले पाहिजे. त्यांचे सारे आयुष्य अंतर्बाह्य झगड्यांनी भरले आहे. ते स्वतः म्हणतात त्याप्रमाणे 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ।।प्रपंच, जग, मन आणि ईश्वर' या सर्वांबरोबर त्यांचा सतत झगडा चालू होता. प्रपंचाच्या झगड्यात ते अयशस्वी ठरले होते पण ईश्वराबरोबरच्या झगड्यात त्यांनी विजय मिळविला. आपणाला झालेल्या साक्षात्काराचे वर्णन त्यांनी सविस्तरपणे आपल्या अभंगांतून

केले आहे. त्यांच्या भक्तीच्या आत्यंतिक भावनेचा विजय होता तो! तुकाराम हे सर्व संतांत पहिल्या प्रतीचे भांडखोर संत होते. म्हणून ते फटकळ होते आणि तोंडाला येतील त्या शब्दांनी देवासकट सर्वांची सारखीच संभावना करीत असत.'' (सुंठणकर बा .रं . *महाराष्ट्रीयन संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य*, लोकवाङ्मयग गृह प्रकाशन मुंबई, तिसरी आवृत्ती २००८, पृष्ठ क्रमांक ,६१) संत तुकोबाना धर्मपीठाबरोबर शेवट पर्यंत संघर्ष करावा लागला होता आणि गावातील पाटील सुद्धा त्यांच्यावर कोपला होता.त्यांची पत्नी सुद्धा संसारातील गोष्टी साठी भांडत होती.हे सर्व संघर्ष तुकोबारायांनी सहन केले होते.

**६) संत तुकोबारायांचे मानवतावादी विचार:**

संत तुकोबारायाच्या अभंगातून संपूर्ण जगाला मानवतेचा संदेश दिलेला आहे. 'जातिभेद अमंगळ' असे ते म्हणतात, तसेच त्यांच्या अभंगातून स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्य ही व्यक्त होताना दिसतात. दया, क्षमा, शांती, प्रेम हे भाव त्यांच्या अभंगातून व्यक्त होतात. जगाला प्रेरणादायी विचारही त्यांनी परखड शब्दांमध्ये मांडलेले आहेत. एकूणच मानवी स्वभावावरती त्यांचे भाष्य करणारे अनेक अभंग आहेत. म्हणूनच संत तुकोबारायांना जगद्गुरु ही उपाधीही रास्तच वाटते. तुकोबाराया आपल्या अभंगातून जगाला संदेश देताना सांगतात की,

"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म |भेदाभेद जाळी पाहे हरि ||
भूतदया येणे वर्म |लक्षवेधी जाणे नाम ||
दया करूनि जीवा |देता दाखविला देवा ||
तुका म्हणे हरि व्यापक सर्वत्र |पूर्णब्रह्म मूर्तिमंत ||"

संपूर्ण जगाला मानवतावादी विचार संत तुकारामांनी दिलेला आहे.म्हणूनच संत तुकोबारायांच्या वरती राजाभाऊ चोपदार लिहतात की, "तुकाराम महाराज म्हणजे केवळ अभंगकार नव्हेत; ते विचारांचे, संवेदनांचे आणि आत्मज्ञानाचे तेजस्वरूप आहेत. त्यांच्या प्रत्येक ओवीतून जो प्रकाश झिरपतो, तो केवळ भक्तीचा नव्हे, तर तो आत्मबोधाचा, विवेकाचा आणि मनुष्यत्वाच्या उच्चतम जाणिवेचा आहे.'' (माने किरण, *शुद्ध बुद्ध काया !! तुकोबाराया' !!* मधुश्री पब्लिकेशन,पुणे,प्रथम आवृत्ती,२०२५ ,पृष्ठ क्र.९) संत तुकारामांच्या अभंगातून सर्व समाजाला मानवतावादी विचार दिले आहेत.समाजातील दांभिकतेवर परखड शब्दात टीका ही करण्याचे धाडस तुकोबारायांच्या अभंगात आहे.

**निष्कर्ष:**

१) संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतून लौकिक आणि पारलौकिक भावजीवन उत्कट पणे अविस्कृत झालेले आहे.
२) संत तुकोबाराय यांच्या अभंगातून मानवतेचे दर्शन घडते.
३) संत तुकोबाराय यांच्या अभंगातून अध्यात्म व संसार याचा समन्वय साधलेला दिसतो.
४) संत तुकोबारायाची अभंगवाणी सामान्य जनतेच्या ह्दयाला जाऊन भिडते.
५) संत तुकोबाराया यांच्या अभंगातून मानवी षड्रिपूवरती भाष्य करून, लोकांना मानवी मूल्यांचे महत्त्व सांगितलेले आहे.
६) तुकोबारायांनी आपल्या अभंगातून संसारातील असारता आणि क्षणभंगुरता सांगितली आहे.
७) संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंग व कीर्तनपरंपरेतून सामाजिक जागृती व भक्तीचा प्रसार केलेला आहे.
८) संत तुकोबारायांनी आपल्या अभंगातून बहुजनांच्या अंधश्रद्धेवरती परखडपणे टीका केलेली आहे तसेच लोकांचे प्रबोधन ही केलेले आहे.

९) तुकोबारायाच्या अभंग समाजातील दांभिकतेवर प्रहार करताना दिसतात.

१०)तुकोबांचा पिंड जसा भावनाप्रधान भक्तांचा आहे तसाच तो परखड समाजसुधारकांचाही आहे, हे त्यांच्या अभंगातून व्यक्त होते.

**समारोप:**

संत तुकोबारायाच्या अभंगातून संपूर्ण जगाला मानवतेचा संदेश दिलेला आहे. तसेच त्यांच्या आयुष्यातील त्यांचे सुरुवातीचे काव्य स्वतःतील षडरिपू वरती विजय मिळवण्यासाठी लिहिलेले दिसते. तुकोबारायांनी समाजातील अनिष्ट चाली रीती विषयी परखड व निर्भीड शब्दात टीका केली आहे. तुकोबारायांनी संसारातील क्षणभंगुरता पटवून दिलेले आहे. त्यांचे स्वः अनुभव अभंगातून व्यक्त केलेले आहेत तसेच तुकोबारायांच्या अभंगातून स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्य ही व्यक्त होताना दिसतात

**संदर्भ ग्रंथ:**


१) नशिराबादकर ल .रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आठवी आवृत्ती २००५,

२) माने किरण, *शुद्ध बुद्ध काया !! तुकोबाराया' !!* मधुश्री पब्लिकेशन,पुणे,प्रथम आवृत्ती,२०२५

३) सुंठणकर बा .रं . *महाराष्ट्रीयन संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य*, लोकवाङ्मयग गृह प्रकाशन मुंबई, तिसरी आवृत्ती.२००८ .

४) इनामदार हे. वि. *अनुभव तुकोबांचा*, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९४.